| MHGA070010562021 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | २७.११.२०२१ |
| नोंदणी तारीख | २७.११.२०२१ |
| निकाल तारीख | ११.०५.२०२६ |
| कालावधी | **०४ वर्षे ०५ महिने १४ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी –११ खाली** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **३०७/२०२१** **अहेरी** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **दि.११.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३९३/२०२१** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी,अहेरी,<br>(फिर्यादी पो.हवा. शंकर डांगे) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **पद्मा श्रीनिवास आलाम,**<br>वय ३० वर्षे, व्यवसाय – घरकाम,<br>राहणार – बोरी, ता. अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञ श्रीमती जैनवार**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

## [फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०८.२०२१ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०४.०८.२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २७.११.२०२१ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २९.०१.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ११.१०.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ११.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राकेश सिताराम मडावी | -- | २७.११.२०२१ | म.दा. प्र. अ. च्या कलम ६५(ई) अन्वये | **निर्दोष** | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.१ | मारोती दामोधर मोहदेकर (**निशाणी ११ खाली**) | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१७**/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी **पी–१८**/स.सा.क्र.०१ | जप्ती पंचनामा |
| २. | निशाणी **पी–१९**/स.सा.क्र.०१ | सि.ए.फार्म |
| ३. | निशाणी **पी–२०**/स.सा.क्र.०१ | फिर्याद |
| ३. | निशाणी **पी–२१**/स.सा.क्र.०१ | छापिल नमुन्यातील खबर |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३०७/२०२१ | एका प्लास्टीक कॅनमध्ये ५ लिटर हातभटटी गुळामोहाची दारू |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ११ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०४.०८.२०२१ रोजी संध्याकाळी ०५.०० ते ०५.४० वाजताच्या सुमारास मौजा बोरी येथे आरोपीच्या घरी एका प्लास्टीक कॅनमध्ये ५ लिटर हातभटटी गुळामोहाची दारू अवैद्यरित्या विनापरवाना बाळगतांना मिळुन आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.११ पुढे नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | दि.०४.०८.२०२१ रोजी संध्याकाळी ०५.०० ते ०५.४० वाजताच्या सुमारास मौजा बोरी येथे आरोपीच्या घरी एका प्लास्टीक कॅनमध्ये ५ लिटर हातभटटी गुळामोहाची दारू बाळगुन विक्री करण्याकरिता मिळुन आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र.१ करिताः</u>

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने फिर्यादी यांना तपासण्यात आले.

३. सा.क्र.१ **मारोती मोहदेकर** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०४.०८.२०२१ रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात असतांना लगाम बिटात तपासकामी काम करित असतांना त्यांना मुखबीरकडून माहिती मिळाली की, मौजा बोरी येथील आरोपी पदमा ही तिच्या राहत्या घरी अवैद्यरित्या हातभटटी गुळामोहाची दारू बाळगुन विक्री करते. त्यावरून ते दोन पंच घेवून आरोपीच्या घरी गेले. पंचासमक्ष आरोपीच्या घराची पहाणी केली असता एका प्लास्टीक कॅनमध्ये ५ लिटर हातभटटी गुळामोहाची दारू मिळून आला. तसा पंचनामा केला. मिळालेल्या मालापैकी गुळामोहाची १८० मिली दारू सि.ए.करिता सिलबंद केली. मालमत्ता शोध, सि.ए.फार्म तयार केला व पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दिली. त्यांनी घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१७, मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र.१८, सि.ए.फार्म नि.क्र.१९, खबर नि.क्र.२० व छापील नमुन्यातील खबर नि.क्र.२१ वरिल सही व मजकुर

बरोबर असल्याचे मान्य केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, जर आरोपी महिला असेल तर तिच्या घरी महिला कर्मचारी सोबत असते व तिच्या घराची घरझडती घेणे आवश्यक असते. विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले तसेच साक्षदार हे पोलिस कर्मचारी आहे. जोपर्यंत त्यांचे साक्षेला इतर स्वतंत्र साक्षीदार दुजोरा करत नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. सदर प्रकरणात जप्त गुळामोहाचा सडवा असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>**

६. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. आरोपी **पद्मा श्रीनिवास आलाम,** हिला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. जप्त मुददेमाल नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.11 13:20:32 +0530

(एस.एम.एच.शाहिद)

दि.११.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी